**जनसंपर्क अधिकारी**

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**

**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- २७८** **दिनांक :- ०२/१०/२०२१**

# “ मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे वर्धापन दिनानिमीत्त विविध उपक्रम ”

तुळींज पोलीस ठाण्यामध्ये दाखल गुन्हयांमधील व तपासादरम्यान जप्त करण्यात आलेला मुद्देमाल मिरारोड भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे वर्धापन दिनानिमीत्त तक्रारदार यांना दिनांक ०१/१०/२०२१ रोजी परत करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमादरम्यान सोन्याचे दागीने, २ कार, ३ ॲटोरिक्षा, ४ मोटारसायकल व २४ मोबाईल असा एकूण १४,३६,०००/- रूपये किंमतीचा १४ गुन्हयांमधील मुद्देमाल कायदेशिर प्रक्रिया पुर्ण करून तक्रादार यांना परत देण्यात आला आहे. सदरचा कार्यक्रम हा वरिष्ठांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे तुळींज पोलीस स्टेशनचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र कांबळे यांचे हस्ते पार पडला आहे. त्याचप्रमाणे माणिकपुर पोलीस स्टेशन, अर्नाळा पोलीस स्टेशनच्या वतीने देखील दाखल गुन्हयातील मुद्देमाल फिर्यादी यांना परत देण्यात आला. तक्रारदार यांना त्यांचे सोन्याचे दागीने, मोटारसायकल, कार, रिक्षा व गहाळ मोबाईल परत मिळाल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले आहे.



नालासोपारा पोलीस स्टेशन व वसई पोलीस स्टेशनच्या वतीने ‘व्यसनाधिनता एक सामाजिक समस्या’ या विषयावर कार्यशाळा आयोजित करून व्यसनापासून कसे दुर राहता येईल याबाबत समुपदेशन करण्यात आले. सदर कार्यक्रमाप्रसंगी डॉ. सुरेश पाटील, सपोआ, चंद्रकांत जाधव, वपोनि सुपे, डॉ. श्रीमती धनवडे व इतर अधिकारी व नागरिक उपस्थित होते.




----ooo----